पुण्य नगरी

# मागासवर्गीय मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशप्रक्रिया सुरू

## क्यूआर कोड स्कॅनद्वारा ऑनलाइन अर्ज उपलब्ध

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**नागपूर : सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाद्वारे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणारी शासकीय वसतिगृहे, शासकीय निवासी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. सामाजिक न्याय विभागांतर्गत नागपूर जिल्ह्यात शहरातील मागावर्गीय मुला, मुलींची एकूण १४ वसतिगृहे तसेच तालुकास्तरावरील मागासवर्गीय मुला, मुलींचे एकूण ११ शासकीय वसतिगृहे आहेत.**

यात उमरेड, कुही (मुलांचे व मुलींचे), बानाडोंगरी (मुलांचे व मुलींचे), नांदा, ता. कामठी (मुलांचे), पारशिवनी (मुलांचे), काटोल (मुलींचे), रामटेक (मुलींचे), कळमेश्वर (मुलींचे), सावनेर (मुलींचे) अशा एकूण २५ शासकीय वसतिगृहांद्वारे विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्रासाठी शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रवेशप्रक्रिया राबविली जात आहे. गरजू व पात्र विद्यार्थी-विद्यार्थिनींकडून यासाठी अर्ज आमंत्रित करण्यात आली आहेत.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, मांग, मेहतर, भंगी, इतर मागासवर्गीय, विशेष मागासप्रवर्गासह इतर प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा आहे. सद्यःस्थितीत इयत्ता आठवी व कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना

## शहरातील वसतिगृह

२०२४-२५ या सत्रातील शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमातील रिक्त जागेसाठी ज्या इच्छुक विद्यार्थी, विद्यार्थिनींना शासकीय वसतिगृहात प्रवेश घ्यावयाचा आहे, अशा गरजू विद्यार्थ्यांनी नागपूर शहरातील सामाजिक न्याय विभागांतर्गत मुलींचे एकूण ६ शासकीय वसतिगृहे व मुलांचे एकूण ८ शासकीय वसतिगृहांत प्रवेशासाठी शहराच्या केंद्रभागी असलेल्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, वसंतनगर, चोखामेळा परिसर, दीक्षाभूमी चौक, नागपूर येथून विनामूल्य अर्ज प्राप्त करून निर्धारित मुदतीत संपूर्ण आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा. तसेच वसतिगृह प्रवेश अर्ज क्यूआर कोडवरूनदेखील उपलब्ध करून घेऊन आवश्यक कागदपत्रांसह वसतिगृहात सादर करता येतील.

## ग्रामीण भागात ११ वसतिगृहांसाठी इच्छुकांना करता येणार अर्ज

तसेच ग्रामीण भागातील तालुकास्तरावरील एकूण ११ वसतिगृहांत प्रवेशासाठी संबंधित तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपाल यांच्याकडून इच्छुकांना अर्ज प्राप्त करून घेता येतील. पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपालांकडे अर्ज सादर करावे, असे आवाहन सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित शासकीय वसतिगृहाचे गृहपाल किंवा साहाय्यक आयुक्त, समाजकल्याण नागपूर या कार्यालयाशी संपर्क करावा. शासकीय वसतिगृहात निवास व भोजनासह अंथरूण- पांघरूण, शैक्षणिक साहित्य, पुस्तके, निर्वाह भत्ता, ग्रंथालय, जिम, ई-लायब्ररी व इंटरनेट वाय-फाय आदी सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतात.

२०२४-२५ या सत्रासाठी वसतिगृहात रिक्त असणाऱ्या जागेवर विनामूल्य प्रवेश ऑफलाइन पद्धतीने देण्यात येत आहे. यासाठी लागणारा अर्जाचा नमुना विद्यार्थ्यांना क्यूआर कोडद्वारे स्कॅन करून घेता येईल. तसेच प्रत्येक वसतिगृहाच्या गृहपालाकडे अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. हे अर्ज आवश्यक ते कागदपत्र जोडून संबंधित तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपालाकडे सादर करावे, असे आवाहन समाजकल्याण विभागाच्या साहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित गृहपाल अथवा साहाय्यक आयुक्त समाजकल्याण विभागाशी विद्यार्थ्यांना संपर्क साधता येईल.

Nagpur Edition Edition
Jul 06, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com